R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ७९

दि.०७ मार्च २०२६,वार: शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# विकसित महाराष्ट्राच्या नावाखाली जनतेची फसवणूक;अर्थसंकल्प २०२६ हा निव्वळ घोषणांचा पाऊस -माजी मंत्री, आमदार अमित देशमुख

लातूर प्रतिनिधी:-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत महाराष्ट्राचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना भव्यदिव्य स्वप्न दाखवत विकसित महाराष्ट्र २०४७ ची संकल्पना मांडली, मात्र या संकल्पनेत समाविष्ट असलेल्या असंख्य योजनांसाठी लागणाऱ्या तरतुदीच्या संदर्भाने कोणतीही आकडेवारी त्यांनी दिली नाही त्यामुळे, युती शासनातील घोषणा संदर्भातील आजवरचा अनुभव लक्षात घेता सदरील संकल्पना केवळ कागदावरच राहणार असल्याचे स्पष्टपणाने दिसून येत आहे, असे राज्याच्या अर्थसंकल्पावर प्रतीक्रीया देतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.

महाराष्ट्र विधीमंडळात आज शुक्रवार दि. ६ मार्च २६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. यावर प्रतिक्रीया देतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले, अर्थसंकल्प सादर करतांना येणारे उत्पन्न आणि भविष्यातील खर्चाचे नियोजन याचा लेखाजोखा मांडणे आवश्यक असते मात्र आजचा अर्थसंकल्प मांडताना, घोषणा खूप केल्या परंतु त्यासाठी किती निधी लागणार आहे आणि त्यासाठी तरतूद किती केली आहे याची आकडेवारी कुठेही दिली नाही, त्यामुळे योजना चांगल्या दिसत असल्या तरी त्याची अंमलबजावणी होणार नाही, याची प्रचिती हा अर्थसंकल्प सादर होताना येत होती.

महाराष्ट्राचा समतोल विकास साधण्याचे प्रयत्न शासन करीत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आज सांगितले मात्र या अर्थसंकल्पात मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी कोणतेही नियोजन दिसलेले नाही, महाराष्ट्रातील इतर अनेक सिंचन प्रकल्पाचा उल्लेख करताना कृष्णा खोऱ्याचे पाणी मराठवाड्यात आणू आणि दमनगंगा-वैतरणा-गोदावरी नदी जोड प्रकल्प राबवण्यासंदर्भात मोघम उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला मात्र मराठवाडा वॉटर ग्रिडसाठीच्या निधी संदर्भात त्यांनी काहीही सांगितले नाही.

राज्यावरील कर्जाचे ओझे ९ लाख ३२ हजार कोटीवर असताना पुन्हा १ कोटीपेक्षा अधिक तुटीचा अर्थसंकल्प मुख्यमंत्र्यांनी सादर केला आहे, मागच्या वर्षात जाहीर केलेल्या योजनांवर फक्त ६० टक्के खर्च झाला आहे. उर्वरित ४० रक्कम त्या योजनांसाठी मिळालीच नाही. त्यामुळे त्या योजना निधीअभावी बंद पडल्या आहेत, आता पुन्हा त्याच योजना नव्याने दाखवण्याची चालाखी या अर्थसंकल्पात करण्यात आल्याचे दिसून येत आहे.



सत्ताधाऱ्यांनी निवडणूक काळात मोठ्या अविर्भावात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते मात्र, शेतकरी आणि विरोधकांनी वर्षभरापासून पाठपुरावा केल्यानंतर कर्जमाफीची घोषणा केली खरी परंतु यातही २ लाखाची मर्यादा घालून शेतकरी वर्गाचा भ्रमनिरास केला गेला आहे. लाडक्या बहिणीसाठीही दरमहा २१०० रुपये देण्याच्या आश्वासन देण्यात आले होते मात्र, ही योजना वर्षभर नक्की चालू राहील अशी कालमर्यादेची घोषणा करून मुख्यमंत्र्यांनी या योजनेबाबत ही अनिश्चितता निर्माण केली आहे.

आर्थिक पाहणी अहवालात महाराष्ट्रातील कृषी विकासदर ९.१ टक्क्यावरून ३.४ टक्क्यापर्यंत घसरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. चांगले पर्जन्यमान झालेले असताना हा विकासदर कमी होण्यामागच्या कारणांचा शोध घेऊन तो विकास दर वाढवण्यासाठी ठोस उपाययोजना केल्याचे या अर्थसंकल्पात कुठेही दिसत नाही. शासनाच्या आयात निर्यात धोरणातील गोंधळामुळे शेतकऱ्यांना आपला माल मातीमोल भावाने विकावा लागत आहे, खरेदी केंद्र नावालाच दिसत आहेत असे असताना आज शेतीमालाला चांगला भाव मिळण्यासाठी एकात्मिक मूल्य साखळी निर्माण करण्याचे नवे आश्वासन देण्यात आले आहे, शेतपानंद रस्त्यांच्या बाबतीतही नेमके हेच घडते आहे.

१ हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेले प्रत्येक गाव सिमेंट कॉंक्रेट रस्त्याने जोडले जाईल अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी आज केली, वास्तविक पाहता यावर्षीच्या अतिवृष्टीत गाव रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली आहे, कॉंक्रीट रस्ते होतील तेव्हा होतील परंतु किमान या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकात्मिक कार्यक्रम राबवण्याची आज गरज असताना मोठे स्वप्न दाखवून आहे, ती परिस्थिती कायम राखण्याचे हे नवीन तंत्र शासनाने अवलंबले आहे असे आमदार देशमुख म्हणाले.

मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांचे मागच्या अनेक महिन्यापासून शिष्यवृत्तीचे पैसे थकलेले आहेत, या संदर्भात काहीच न सांगता सारथी बार्टी, आर्टी, महाज्योती, मार्टी, वनार्टी, टीआरटीआय या संस्थांसाठी भरीव तरतूद केल्याची मोघम घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे असे सांगीतले.

सिंचन, उद्योग, व्यापार वाढीच्या संदर्भाने शासनाकडून फक्त योजनांच्या घोषणा करण्यात आले आहेत, अंमलबजावणीसाठी ना निधी ना नियोजन अशीच अवस्था आहे असे आमदार देशमुख अर्थसंकल्पा संदर्भात म्हणाले आहेत.

# मुंबईतील २०१४ च्या पात्र यादीतील पथविक्रेत्यांना,तात्पुरत्या स्वरूपाची जागा उपलब्ध करून देणार-मंत्री डॉ.उदय सामंत

मुंबई : मुंबईतील पथविक्रेत्यांच्या (हॉकर) प्रश्नासंदर्भात दाखल असलेल्या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाली असून उच्च न्यायालयाचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे. मात्र हा निर्णय येईपर्यंत २०२४ च्या पात्र यादीप्रमाणे पथविक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपाची जागा (पिचेस) उपलब्ध करून देण्याचे महापालिकेला निर्देश देण्यात येतील अशी माहिती, मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधानसभेत दिली.

मुंबई शहरात पथविक्रेता कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत लक्षवेधी प्रश्न आमदार रईस शेख यांनी उपस्थित केले होते.

मंत्री सामंत म्हणाले की, मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २०१४ मध्ये हॉकरांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्या वेळी १,२८,४४३ अर्ज वितरित करण्यात आले होते. त्यापैकी ९९,४३५ अर्ज महानगरपालिकेला प्राप्त झाले असून त्यातील ३२,४१५ पथविक्रेते अधिकृतपणे पात्र ठरले आहेत. हॉकरांच्या प्रश्नावर विविध संघटनांनी न्यायालयात धाव घेतली होती. पथविक्रेत्यांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कायमस्वरूपी हॉकर झोन निश्चित होईपर्यंत अनावश्यक निष्कासन करू नये तसेच आवश्यक असल्यास पुनर्वसनाची व्यवस्था करावी, असे निर्देश देण्यात आले होते.

मंत्री डॉ.सामंत म्हणाले की ,पथविक्रेता सर्वेक्षणाला पाच वर्षे पूर्ण झाल्यास नव्याने सर्वेक्षण करून योग्य-अयोग्य ठिकाणांची पडताळणी करावी. मुंबई महानगरपालिकेने केंद्र सरकारच्या पथविक्रेता कायद्यानुसार शहरात हॉकर झोन निश्चित करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करावा आणि विक्री प्रमाणपत्रांची छाननी करून नवीन प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया राबवावी. दादर परिसरात पहाटे २ ते सकाळी १० वाजेपर्यंत भाजीपाला वाहून आणणाऱ्या ट्रकांमुळे वाहतुकीची समस्या निर्माण होते. या संदर्भात मुंबई पोलीस आणि महानगरपालिकेने नागरिकांना त्रास होऊ नये तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर म्हणाले की,२०१४ जी पात्र हॉकर्स यादी अंतिम आहे. या हॉकर्सना रोजगारापासून वंचित ठेवता कामा नये. त्यानुषंगाने पात्र हॉकर्सना तात्पुरत्या स्वरूपाची जागा (पिचेस) देण्यात यावेत.ज्यावेळी कायमस्वरूपी पिचेस देणार आहात त्यावेळी तात्पुरते पिचेस काढून घेवू शकता असे निर्देश त्यांनी दिले.

या प्रश्नाच्या चर्चेत विधानसभा सदस्य अमिन पटेल,अमित साटम,अस्लम शेख यांनी सहभाग घेतला.

# महाविद्यालयांतील अतिरिक्त शुल्कांवर नियंत्रण आणणार- उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

मुंबई: महाविद्यालयांमध्ये विविध नावांनी आकारल्या जाणाऱ्या अतिरिक्त शुल्कांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने पावले उचलली असून, शुल्क नियामक प्राधिकरणाकडून आता ट्युशन फीबरोबरच इतर शुल्कांवरही नियंत्रण ठेवले जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

भुसावळ (जि. जळगाव) येथील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींकडून जादा शुल्क आकारल्याबाबत विधानसभा सदस्य अस्लम शेख यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, विद्यापीठाने चौकशी करून भुसावळ (जि. जळगाव) येथील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयाकडून वसुल केलेली अतिरिक्त रक्कम परत घेतली असून त्यावर दंडही आकारण्यात आला आहे. हा दंड विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वापरण्यात येणार आहे.

काही महाविद्यालयांकडून पॉवर चार्जिंग, कॉम्प्युटर लॅब आदी नावाने शुल्क आकारले जात असल्याची बाब चौकशीत समोर आली. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून आकारल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या शुल्कांवर नियंत्रण ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

आर्ट्स, सायन्स व कॉमर्स अभ्यासक्रमांची 'ट्युशन फी' अत्यंत नाममात्र असून ठरावीक उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना शुल्क सवलतीचीही तरतूद आहे. मात्र अनेक महाविद्यालयांकडून 'अदर फी' किंवा इतर शुल्क आकारले जात असल्याने आता अतिरिक्त शुल्कांवरही नियमन करण्यात येणार असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले

# र्यावरणीय दृष्टिकोनातून श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर परिसराचा विकास करावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : कोल्हापूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर येथे राज्यातूनच नव्हे, तर देशातून मोठ्या संख्येने भाविक घेत असतात. या परिसराचे पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्व आहे. या मंदिर परिसराचा विकास हा पर्यावरणीय दृष्टिकोनातून करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसर विकासाचा एकूण आराखडा २५० कोटी रुपयांचा आहे. त्यापैकी ८० कोटी रुपयांची कामे सुरू झालेली आहेत. श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसराचा सुधारित १७० कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे आयोजित शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वन मंत्री गणेश नाईक, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार विनय कोरे, आमदार राहुल आवाडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्योतिबा मंदिर डोंगर परिसराचा विकास करताना मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात यावी. आधी लागवड केलेल्या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे. डोंगर परिसरावर घनकचरा व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यात यावे. मंदिर परिसरात अनेक भाविक अन्नदान करीत असतात या अन्नदानाकरिता अन्न छत्रालय विकसित करण्यात यावे. येथे जास्तीत जास्त भाविक सामावून घेण्याची क्षमता असावी.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, डोंगर परिसराचे पर्यावरणीय महत्त्व लक्षात घेता, येथे असणाऱ्या वस्तीमधील सांडपाणी व्यवस्थापन करावे. येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता स्वच्छतेबाबत काटेकर नियोजन करण्यात यावे. डोंगर परिसरात असलेल्या वन जमिनीचे नियमानुसार हस्तांतरण करुन मंदिर परिसराचा विकास व्हावा, यासाठी स्वतंत्र प्राधिकरण बैठकीत सादरीकरण कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

थोडक्यात विकास आराखडा□कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात असलेल्या श्रीक्षेत्र ज्योतिबा मंदिर व परिसर विकास आराखडा आराखड्यामध्ये श्री ज्योतिबा डोंगरावरील जुन्या पायवाटांचे दुरुस्तीसह रुंदीकरण करण्यात येणार आहे.

तसेच पायवाटांच्या बाजूने विविध प्रकल्पांमध्ये बाधित होणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, विद्युत नियंत्रण कक्ष, पोलीस कक्ष व देवस्थान व्यवस्थापन कार्यालय, यमाईदेवी मंदिर परिसरात भाविकांसाठी सुविधा केंद्र, मंदिराचे दक्षिणद्वार प्रवेश मार्गाची दुरुस्ती, शाहूकालीन हुजूरवाडा इमारत संवर्धन, कुशीरे ते गायमुख तलाव पार्किंगसह पादचारी मार्गाचा विकास, पाच मेगावॉट समतेचे वीज उपकेंद्र व सौर ऊर्जा प्रकल्प, भाविकांसाठी निवास व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा कक्ष व अन्नछत्र, वाडी रत्नागिरी गावामधील रहिवासी व भाविकांसाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था करण्यात येणार आहे.

## संपादकीय...

# इस्रायलला जग का घाबरते? सामर्थ्य, रणनीती आणि जागतिक राजकारण

मध्यपूर्वेतील छोटासा देश असलेला इस्रायल हा जगाच्या राजकारणात अत्यंत प्रभावशाली मानला जातो. क्षेत्रफळ आणि लोकसंख्या कमी असतानाही या देशाने आपल्या लष्करी ताकदीमुळे, तांत्रिक प्रगतीमुळे आणि मजबूत राजनैतिक संबंधांमुळे जगभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे अनेकदा असा प्रश्न उपस्थित केला जातो की, इस्रायलला जगातील अनेक देश थेट विरोध करण्यास का टाळाटाळ करतात.

इस्रायलची स्थापना १९४८ मध्ये झाली आणि त्या क्षणापासूनच या देशाला सुरक्षेची गंभीर आव्हाने होती. स्थापनेनंतर लगेचच अनेक शेजारी अरब देशांशी संघर्ष सुरू झाला. त्या काळातील अरबइस्रायल युद्ध १९४८ हे त्याचे पहिले उदाहरण होते. त्यानंतरही या प्रदेशात अनेक संघर्ष झाले. या सततच्या धोक्यामुळे इस्रायलने आपल्या लष्करी क्षमतेवर विशेष भर दिला.

आज इस्रायलचे सैन्य जगातील अत्यंत प्रशिक्षित आणि आधुनिक सैन्यांपैकी एक मानले जाते. अत्याधुनिक शस्त्रसज्जता, तंत्रज्ञानाचा वापर आणि युद्धनीती यामुळे इस्रायलने स्वतःची संरक्षणव्यवस्था अत्यंत मजबूत केली आहे. छोटा देश असूनही त्याची लष्करी तयारी अनेक मोठ्या देशांइतकी प्रभावी मानली जाते.

इस्रायलची आणखी एक मोठी ताकद म्हणजे त्याची गुप्तचर यंत्रणा. मोसाद ही संस्था जगातील सर्वात प्रभावी गुप्तचर संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते. दहशतवादविरोधी कारवाया, गुप्त माहिती गोळा करणे आणि अचूक नियोजन यामुळे मोसादची जागतिक स्तरावर वेगळी ओळख आहे. या संस्थेच्या कारवायांमुळे इस्रायलची सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत बनली आहे.

इस्रायलच्या प्रभावामागे त्याचे आंतरराष्ट्रीय मित्रदेशही तितकेच महत्त्वाचे आहेत. विशेषतः अमेरिका हा इस्रायलचा सर्वात मोठा मित्रदेश मानला जातो. आर्थिक मदत, संरक्षण तंत्रज्ञान आणि राजनैतिक पाठिंबा या माध्यमातून अमेरिका इस्रायलला मोठा आधार देते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मंचांवर इस्रायलचे स्थान अधिक मजबूत राहते.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही इस्रायलने उल्लेखनीय प्रगती केली आहे. सायबर सुरक्षा, संरक्षण तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधन आणि स्टार्टअप उद्योग या क्षेत्रांत इस्रायल जगात अग्रगण्य देशांपैकी एक मानला जातो. अनेक जागतिक कंपन्या इस्रायलमधील संशोधन आणि तांत्रिक नवकल्पनांकडे लक्ष देतात.

कृषी क्षेत्रातही इस्रायलने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वाळवंटी प्रदेशातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी याचे उत्कृष्ट उदाहरण इस्रायलने जगासमोर ठेवले आहे. ड्रिप सिंचन तंत्रज्ञानासारख्या अनेक नवकल्पना इस्रायलने विकसित केल्या आहेत, ज्याचा फायदा जगातील अनेक देश घेत आहेत.

मध्यपूर्वेतील राजकारणात इस्रायलचे स्थान अत्यंत संवेदनशील आहे. विशेषतः गाझा पट्टी, वेस्ट बँक आणि जेरुसलेम या भागांवरून इस्रायल आणि पॅलेस्टाईनमध्ये दीर्घकाळ संघर्ष सुरू आहे. या प्रश्नामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक राजकीय चर्चा होत असतात.

पॅलेस्टाईन प्रश्नामुळे अनेक देश इस्रायलच्या धोरणांवर टीका करतात, तर काही देश इस्रायलच्या सुरक्षेच्या भूमिकेला समर्थन देतात. त्यामुळे या विषयावर जागतिक राजकारणात मतभेद दिसून येतात. यामुळेच मध्यपूर्वेतील परिस्थिती अनेकदा तणावपूर्ण बनते.

तथापि, सर्व देश इस्रायलला घाबरतात असे म्हणणे पूर्णपणे योग्य नाही. अनेक देश इस्रायलशी मतभेद असूनही राजनैतिक आणि आर्थिक संबंध ठेवतात. कारण आजच्या जागतिक व्यवस्थेत सहकार्य आणि संवाद हे संघर्षापेक्षा अधिक महत्त्वाचे मानले जाते.

इस्रायलच्या यशामागे त्याच्या नागरिकांची जिद्द आणि राष्ट्रभक्तीही महत्त्वाची आहे. देशाच्या सुरक्षेसाठी आणि प्रगतीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात योगदान देतात. अनेक युवक अनिवार्य सैन्य सेवेत सहभागी होतात, ज्यामुळे देशाची सुरक्षा व्यवस्था मजबूत राहते.

आजच्या काळात इस्रायल हा केवळ लष्करीदृष्ट्या मजबूत देश नाही, तर तांत्रिक, आर्थिक आणि वैज्ञानिक प्रगतीतही अग्रगण्य देश म्हणून ओळखला जातो. संकटांच्या परिस्थितीतही विकासाचा मार्ग कसा शोधायचा, याचे उदाहरण इस्रायलने जगासमोर ठेवले आहे.

जागतिक राजकारणात कोणत्याही देशाचे स्थान केवळ शक्तीवर अवलंबून नसते; त्यासाठी मजबूत कूटनीती, आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय संबंधही आवश्यक असतात. इस्रायलने या तिन्ही क्षेत्रांत प्रभावी कामगिरी करत आपले स्थान निर्माण केले आहे.

एकंदरीत पाहता, लहान भूभाग असूनही इस्रायलने जागतिक स्तरावर मोठा प्रभाव निर्माण केला आहे. लष्करी ताकद, अत्याधुनिक तंत्रज्ञान, गुप्तचर यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय मित्रदेश यामुळे इस्रायलचे स्थान जागतिक राजकारणात महत्त्वाचे बनले आहे. त्यामुळेच अनेक देश इस्रायलच्या भूमिकेकडे गांभीर्याने पाहतात.

# उच्चवर्णीय जमीनदारीला आव्हान! म्हणजे आगरी कोळी गावठाण चळवळ.- राजाराम पाटील.

आपल्या देशात विषमता आहे. ही वास्तव स्थिती या देशातील सरंजामी मराठा ब्राह्मण वैश्य लोक आजही मान्य करीत नाहीत.अर्थात ही विकृती केवळ भारतातच नाही. आज जगात जे युद्ध अमेरिकेने पुकारलेले आहे.त्या युद्धाचा हेतू जगातील सर्व साधनं संपत्ती आमचीच असावी?.या साम्राज्यवादी धोरणातून इराण या राष्ट्रावर लादलेले युद्ध,असाच आहे.मानवी हव्यास हा राजा ययाती सारखा,दुसऱ्या माणसांचे अधिकार नाकारतो. तेव्हा जगाला युद्धासारख्या भयंकर संकटाना सामोरे जावे लागते.यात दोन राष्ट्रांचे सैनिकच,मारले जातात ?.असे नाही. तर निरागस मुले,आया बहिणी वृद्ध यांना अमानुष छळ,बलात्कार,कायमचे अपंगत्व,बेकारी,महागाई यांना सामोरे जावे लागते.

भारतात धर्म,राष्ट्र या संकल्पना केवळ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या मालकीच्या आहेत. शूद्र अतिशूद्र स्त्रिया यांचे स्थान अधिकारी तेथे नाकारले जातात.अशी वैचारिक मांडणी मनुस्मृतीच्या माध्यमातून झालेली आहे.देशातील ८५टक्के ओबीसी एससी एसटी आणि स्त्रिया यांचे शोषण,कायम उच्चवर्णीयांनी केले आहे.अर्थात देशाच्या समाजरचनेत उच्चवर्णीय विरुद्ध स्त्री शूद्र अतिशूद्र यांच्यातील शीतयुद्ध कायम सुरू असते.भारताच्या धार्मिक विषमतेविरुद्ध २००० वर्षापासून बुद्ध महावीर चार्वाक यांनी आवाज उठविला आहे.अलीकडील काळात छत्रपती शिवराय,महात्मा फुले,सावित्रीमाई फुले,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्याने शूद्र अतिशूद्र स्त्रिया यांच्या अधिकारांचे म्हणजेच समतेचे युद्ध उच्चवर्णीय लोकांविरुद्ध नेहमीच पुकारले आहे.मागासवर्गीय लोकांवर अत्याचारांची प्रेरणा मनुस्मृती प्रणित वैदिक हिंदू धर्म देतो.यातून अनेक वेळा धर्मांतराची धार्मिक बंडखोरी झाली आहे.भारताच्या संविधानकारांना सुद्धा बौद्ध धर्मांतर करावे लागले.हा विषमतेच्या अत्याचारांचा त्यावरील ऐतिहासिक उपायांचा, अलीकडील जिवंत पुरावा आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आगरी कोळी भंडारी कुणबी कराडी या ओबीसी शूद्र जातीना घेऊन जमीन कसणाऱ्या भूमिहीन कुळाचे बंड, कोकणात खोत सावकार या उच्चवर्णीय जातींविरोधात पुकारले.यातूनच शूद्र म्हणून धर्माने लादलेल्या गुलामी विरुद्ध स्वातंत्र्याचा अनुभव,देशाच्या इंग्रज सरकारच्या गुलामीतून मुक्त होण्याअगोदर आगरी कोळी ओबिसिनी घेतला आहे.आधी इंग्रजांपासून राजकीय स्वातंत्र्य? की ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्यापासून धार्मिक, सामाजिक स्वातंत्र्य? यात आमचे म्हणजे आगरी कोळी भंडारी कुणबी ओबीसी यांचे स्वातंत्र्यवीर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आगरी नेते नारायण नागू पाटील भंडारी नेते सी के बोले हेच आहेत.ओबीसी आजही मानसिक दृष्ट्या उच्चवर्णीय गुलामीत जगत असल्यामुळे,आमचे स्वातंत्र्यवीर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत.ब्राह्मण लोकांच्या हिंदू राष्ट्राचे स्वातंत्रवीर हे विनायक दामोदर सावरकर आहेत.ही वास्तव स्थिती समजून घेत नाहीत.हिंदू राष्ट्रात आगरी कोळी भंडारी लोकांना ते कसत असलेल्या शेतजमिनी राहत असलेली घरे मालकीने मिळावीत? असे क्षणभर सुद्धा ज्या उच्चवर्णीय नेतृत्वाच्या मनात आले असेल ?.तर लोकांनी त्या नेत्याचे नाव जाहीर करावे.

हिंदुत्वाचा वैदिक ब्राह्मणाचा, क्षत्रिय सत्ताधारी वंश आणि दगलबाज शोषणाचा पुरस्कार करण्यात पुढे राहिलेल्या वैश्य अदानी अंबानी लोढा यांचा खरा परिचय आजच्या ओबीसी नेतृत्वाने नव्याने करून घ्यावा. आमच्या जमीन हक्कांचा कुळकायदा आम्हास डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला.परंतु यामागचा सामाजिक समतेचा लढा आम्हास आजही नव्या पिढीस समजावता आला नाही. ओबीसींना गुलाम करण्यासाठी ब्राह्मण बुवा,बापू,नाना,दादा या नव प्रवचनकारांना ब्राह्मणी लोकांनी पुढे आणले. त्यामुळे जमीनदारी विरोधात लढण्यास तयार झालेला.शिवराय भीमराय यांचा कोकणातला मावळा पुन्हा धार्मिक अंधतेने गुलाम झाला. कुळ कायद्याची अंमलबजावणी धार्मिक,राजकीय प्रशासकीय उच्चवर्णीय नेतृत्वाने संपविली. एमआयडीसी,सिडको,सेझ,एम एम आर डी, नैना विमानतळ दुसरी तिसरी मुंबई अशी विकासाची नावे घेऊन कुळ कायद्याने मिळालेल्या जमिनी पुन्हा उच्चवर्णीय लोकांनी सरकारी खाजगी भूसंपादनातून गिळून टाकल्या.

आज आगरी कोळी ओबीसी राहतो ती घरे गावठाणे एस आर ए,क्लस्टर,सिडको या नावाने संपविण्याचा विडा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,लोढा,अदानी अंबानी यांनी उचलला आहे.

लढाई हजारो वर्षे तीच आहे. उच्चवर्णीय विरुद्ध स्त्री शूद्र अतिशूद्र यांची आहे.आज कोळीवाडे गावठाणे भंडार वाडे आदिवासी पाडे,ईस्ट इंडियन गावठाणे वाचविण्याची लढाई मुंबई ठाणे रायगड पालघर इथे सुरू आहे.लोकांची साथ मिळाली?. तर जमीन घरे यांच्या वर लादलेली जमीनदारी म्हणजे आधुनिक भारताची गुलामी आपण झुगारून देऊ शकतो.

आपले सहकार्य,आणि मोलाची साथ हवी.

जय भीम.जय ओबीसी.जय संविधान.जय भारत.

**राजाराम पाटील-**
**८२८६०४१४६३.**
**उरण जिल्हा रायगड.**

# महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व मानाचे पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर  देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे. देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात  महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे. आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या प्रमाणात दीसुन येतात. अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केलेले नाही. ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा महीलांपासुनचसर्वांना मिळत असते. कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना संस्कृतीचापाठ शिकवित असतात. म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील, राष्ट्रपती,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे. म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर, उपमुख्यमंत्री, अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या,आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही. महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल. आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने फास्ट ट्रॅककोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात. कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर  महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये तारीख पे तारीखअसा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा संकल्पकेला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल. म्हणुनच म्हणतात बेटी बचाव बेटी पढाव. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे. आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!जय भारत.

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

# शालेय वाहतूक नियमांच्या तपासणीसाठी राज्यभर विशेष मोहीम राबविणार- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

मुंबई : राज्यात शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी शासनाचे स्पष्ट धोरण असून शाळा स्तरावर परिवहन समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा बस सुरक्षा समिती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच शालेय वाहतूक नियमांची तपासणीसाठी राज्यभर विशेष मोहीम राबविणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे खासगी शाळेच्या व्हॅनमधून दोन विद्यार्थी पडून जखमी झाल्याच्या घटनेबाबत विधानसभा सदस्य रईस शेख यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य अभिमन्यू पवार, विठ्ठल लंघे, नाना पटोले, संजय मेश्राम या सदस्यांनीही सहभाग घेतला.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, ७ जुलै, २०२५ रोजी अंबरनाथ येथील एका खासगी इंग्रजी शाळेच्या व्हॅनमधून काही विद्यार्थी प्रवास करत असताना दोन विद्यार्थी खाली पडून जखमी झाले. हे वाहन संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांनी खासगीरित्या लावलेले होते. घटनेच्या दिवशीच पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून दुसऱ्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून संबंधित वाहनावर कारवाई करण्यात आली.

शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहनचालकांची पडताळणी, बसमध्ये जीपीएस प्रणाली, सीसीटीव्ही कॅमेरे, महिला सेवकाची नियुक्ती, वाहतूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण तसेच चालकांनी मद्य किंवा अमली पदार्थांचे सेवन केलेले नसल्याची पोलिसांकडून पडताळणी यांसारख्या बाबी शाळांसाठी बंधनकारक करण्यात आल्या आहेत. तसेच शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन आणि आरटीओ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवून शालेय वाहतूक नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

विद्यार्थी वाहतुकीसाठी वाहनांना स्वतंत्र परवाना आवश्यक : अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर-विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठीच्या वाहनांना स्वतंत्र परवाना देण्यात यावा. शिक्षण व परिवहन विभागांनी संयुक्तपणे जबाबदारी घेऊन रिक्षा किंवा बसद्वारे विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सीसीटीव्ही, जीपीएससह आवश्यक अटी पूर्ण केल्यानंतरच परवाना द्यावा. परवान्याशिवाय विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी वाहने आढळल्यास ती जप्त करण्याची कारवाई करावी, असे निर्देश विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत दिले.

# कामगारांच्या सुरक्षेसाठी नवीन 'लेबर कोड' अंतर्गत कंपन्या बंद करण्याचे अधिकार- कामगार मंत्री आकाश फुंडकर

मुंबई,: नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्यील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ही कंपनी बंद केली आहे. या प्रकरणात मालकासह २१ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. यापुढे केवळ नोटीस देऊन न थांबता, सुरक्षेच्या त्रुटी आढळल्यास थेट कंपनी बंद करण्याचे अधिकार नवीन कामगार कायद्यान्वये प्राप्त होणार आहेत. या प्रकरणात कामगार विभागातील अधिकाऱ्यांचीही चौकशी करणार असे लक्षवेधीला उत्तर देतांना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत सांगितले.

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कंपनीत स्फोट होवून १८ कामगारांचा मृत्यू झाला. यासंदर्भात लक्षवेधी अतुल भातखळकर यांनी विधानसभेत मांडली.

कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले की या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून या घटनेची चौकशी सुरू आहे. यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर ३०२ चे गुन्हे दाखल करू. शासन या प्रकरणात संवेदनशील असून या प्रकरणात दोषींची गय केली जाणार नाही.

राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल म्हणाले की, या स्फोटाच्या घटनेनंतर महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या प्रकरणात मालकासह २१ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. एका व्यक्तीला कंपनीत डायरेक्टर करून जबाबदारी झटकण्याची पद्धत आता चालणार नाही. सध्याच्या कामगार कायद्यानुसार त्रुटी आढळल्यास केवळ नोटीस देणे किंवा खटला दाखल करण्याचे मर्यादित अधिकार आहेत. मात्र, आगामी नवीन कामगार कायद्यान्वये, कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपन्यांना थेट टाळे ठोकण्याचे अधिकार प्रशासनाला मिळणार आहेत. कारखान्यातील सुरक्षेच्या त्रुटी केवळ अधिकाऱ्यांच्या रेकॉर्डवर राहू नयेत, तर त्या प्रत्यक्ष कामगारांना माहित असणे आवश्यक आहे. यासाठी नवीन नियमांची अंमलबजावणी केली जाईल.कारखान्यातील त्रुटींची माहिती कंपनीच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणे अनिवार्य असेल. सुरक्षेच्या तपासणीवेळी कामगारांचा प्रतिनिधी उपस्थित असेल. सुरक्षेबाबतच्या सूचना आणि त्रुटींची माहिती कामगारांना मिळाल्याची खात्री केली जाईल.

राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल म्हणाले की, या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महसूल मंत्री यांनी 'पेसो' पेट्रोलियम अँड एक्स्प्लोजीव्ह सेफ्टी ऑरगनायझेशन या केंद्रीय विभागाशी चर्चा केली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून नागपूर विभागातील अशा सर्व घातक कारखान्यांचे तातडीने ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विभागीय स्तरावर सर्व संबंधित घटकांची बैठक घेऊन सुरक्षेच्या २५ मुद्द्यांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. या जिल्ह्यात घडलेल्या सर्व घटनांबाबत कडक कारवाई केलेली आहे. कामगार कायद्या अंतर्गत आवश्यक कारवाई करण्यात आली आहे. मालकासहित २१ जणांवर थेट मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात कठोरात कठोर कारवाई केली जाईल.

या प्रश्नाच्या चर्चेत विधानसभा सदस्य नाना पटोले, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार,चरणसिंह ठाकूर, समीर कुणावार, संजय मेश्राम यांनी सहभाग घेतला.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी हा मास्टरस्ट्रोक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




मुंबई: ग्रामीण आणि शहरी महाराष्ट्राचा समतोल विकास साधणारा व्हिजनरी असा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला आहे. एकीकडे शेतकऱ्यांना कर्जमाफी, लाडक्या बहिणीसाठी तरतूद करून सामाजिक भान ठेवले आहे तर दुसरीकडे राज्यातील कानाकोपऱ्यातील गावे आणि शहरे एकमेकांशी व्यवस्थित जोडून अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम केले आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात मांडण्यात आल्यानंतर उपमुख्यमंत्री यांनी शिंदे यांचे स्वागत केले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सुद्धा अभिनंदन केले.

प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन अशा चार स्तंभांवर विकसित महाराष्ट्र २०४७ ची उभारणी होणार असून एक निश्चित अशी विकासाची दिशा आता मिळाली आहे असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करून पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय म्हणजे राज्य शासनाचा मास्टरस्ट्रोक आहे असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, बळीराजाच्या पाठीशी राज्य शासन कायम ठामपणे उभे आहे हे यातून सिद्ध होते. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा याचा लाभ होणार आहे तसेच नियमित कर्ज परतफेड केली असल्यास ५० हजारापर्यंत प्रोत्साहनपर लाभ देखील शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल याची खात्री वाटते.

लाडकी बहीण योजनेसंदर्भात अपप्रचार चालवला होता. मात्र,अर्थसंकल्पात आम्ही या योजनेसाठी तरतूद करण्याचे स्पष्ट केल्याने ही योजना आम्ही अधिक चांगली राबवून महिलांचे सक्षमीकरण करणार आहोत असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात ग्रामीण आणि शहरी भागांना व्यवस्थित जोडण्यासाठी अत्यंत सुयोग्य पद्धतीचे नियोजन या अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. यामध्ये रस्ते, मेट्रो, जलमार्ग, तसेच राज्यातील विविध विमानतळ यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे मोठे जाळे निर्माण करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पर्यटनासाठी पोषक असे राज्य बनविण्याचे उद्दिष्ट्य शासनाने समोर ठेवले आहे. मुंबई महानगरातील २० लाख झोपडीधारकांच्या घरांचा पुनर्विकास करण्यासाठी भाडे तत्वावरील घरांसह १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे असेही ते म्हणाले. एकीकडे आर्थिक शिस्त लावतांना दुसरीकडे एआय आधारित शेतीचा मजबूत पाया रचून कृषी क्षेत्राला नवे दिवस दाखवणारा हा अर्थसंकल्प आहे, त्याचप्रमाणे एकूणच विविध विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचं दैनंदिन जीवन सहज सुलभ आणि सुखी करण्याकडे ठोस पावलं उचलणारा हा अर्थसंकल्प आहे असेही ते म्हणाले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त जनकल्याणाचे उपक्रमही राज्यात हाती घेण्यात येणार आहेत, त्याविषयी सविस्तर माहिती आणि नियोजन लवकरच जाहीर करण्यात येत आहे असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील नागरिकांना शासकीय योजना, सेवा सहजपणे, सुलभ आणि उत्तरदायी पद्धतीने देण्यासाठी तशी यंत्रणा उभारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासनातली ७५ हजार रिक्त पदेही भरण्यात येणार असल्याने युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधीही उपलब्ध होणार आहे.

हे वर्ष सामाजिक समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरे करण्याचा आणि अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारून त्यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देण्याच्या निर्णयामुळे देखील योग्य संदेश जाईल, असेही ते म्हणाले.

पर्यटन उद्योगाला महाराष्ट्रात मोठा वाव आहे. त्यादृष्टीने छोट्या छोट्या पर्यटन स्थळांचा विकास करून ग्रामीण भागातही अर्थव्यवस्थेला चालना देणे, रोजगार वाढविणे शक्य होणार आहे. उद्योग क्षेत्राचे उत्पादन दीड हजार अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट्य ठेवतांना त्यासाठी विविध धोरणे जाहीर करून सेवा क्षेत्र आणि तंत्रज्ञानाला देखील प्रोत्साहन देण्याचे नियोजन या अर्थसंकल्पात केले आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अटल सेतूच्या परिसरात तिसरी मुंबई उभारून एकूणच मुंबई महानगराला आणखी शक्तीशाली करण्याचा या अर्थसंकल्पात निर्धार व्यक्त केला आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रीलियन डॉलर्स करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट्य आहे आणि यात महाराष्ट्राचे योगदान खूप मोठे असणार आहे, याचे सुतोवाच करणारा हा अर्थसंकल्प आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# महाराष्ट्राच्या चौंफेर विकासाची सर्वसमावेशक मांडणी करणारा अर्थसंकल्प महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई,: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्प केवळ आकडे नाहीत; तर वास्तवाची जाणीव व भविष्याची झेप घेत २०४७ कडे जाणाऱ्या विकसित महाराष्ट्राचा प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासनाचे सूत्र निश्चित करणारा रोडमॅप आहे. या अर्थसंकल्पाची अनेक वैशिष्ट्ये आहेत, पण शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कायम ठेवणाऱ्या घोषणांमुळे राज्यातील कोट्यवधी शेतकरी बांधव व बहिणींना अभूतपूर्व दिलासा मिळाला, असल्याची प्रतिक्रिया महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आल्याने तसेच, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येणार असल्याने मी मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आभार मानले

महाराष्ट्राच्या चौफेर विकासाची सर्वसमावेशक मांडणी करणारा अर्थसंकल्प असून, ग्रामीण विकासासोबतच नागरी भागातील सर्व घटकांचा विकास करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

२०४७ पर्यंत ७० टक्के लोकसंख्या नागरी भागातील असेल हे सूत्र लक्षात घेऊन राज्यात दहा ठिकाणी नागरी शहरी विकास प्राधिकरणे स्थापन करण्यासोबतच एक हजार लोकसंख्या असलेली गावे काँक्रिट रस्त्याने जोडण्याचा महत्वाकांक्षी रस्ते निर्मिती प्रकल्प म्हणजे शहरी व ग्रामीण भागाचा नियोजनबद्ध विकास करण्याची मुहूर्तमेढ आहे.

ज्यांनी आपला महाराष्ट्र घडविला, माणुसकीचा संस्कार आपल्यावर केला अशा थोर समाजसुधारकांच्या स्मरणार्थ येणारे वर्ष 'सामाजिक समता व समरसता वर्ष' साजरे करण्यात येणार आहे, ही या अर्थसंकल्पाची सामाजिक जाणीवेची महत्वाची बाजू आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संसदीय कारकिर्दीची दखल म्हणून 'गतिमान नागरी सेवा पुरस्कार' देण्याची घोषणा आपल्या कर्तव्यदक्ष नेत्याला वाहिलेली अनोखी आदरांजली आहे.

पायाभूत सुविधा, रोजगार, उद्योग, शेतीविकास, ग्रामविकास, उद्योग, ऊर्जा, विमानतळे, रस्ते, मेट्रो, रेल्वे असा वाहतूक विकास, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रशासनात वापर, रोजगाराभिमुख विकसित पर्यटन, परवडणारी घरे, तिसरी मुंबई, रामटेकजवळ तिसरी चित्रपट नगरी, नवीन नागपूर, विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सवलत, विविध महामंडळासाठी योजना, स्टार्टअपला प्रोत्साहन, सर्वसामान्यांना आरोग्य, सांस्कृतिक वारसा, क्रीडा गुणवत्ता विकास केंद्रे, राज्याचा प्रशासकीय दर्जा उन्नत, पारदर्शक, गतिमान व उत्तरदायी करण्यासाठी प्रयत्न करणार, शासनात ७५ हजार नवीन पदभरती, नागरिकांच्या मालमत्तांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी धोरण, स्मार्ट पोलिसिंग, महसूल प्रणालीचे आधुनिकीकरण, महाराष्ट्र सार्वजनिक खासगी भागीदारी धोरण, पर्यावरण संरक्षण, मुद्रांक अधिनियमातील सुधारणा म्हणजे वेगवान सरकारची धडाकेबाज कामगिरी आहे.

महाराष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात हा अर्थसंकल्प नक्कीच सकारात्मक बदल घडवेल असेही महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.

# चाकूर पं. स रा. काँ. च्या गटनेते पदी गजानन होनराव यांची निवड

चाकूर-चापोली येथील नवनिर्वाचित तोरे सह विविध मान्यवर उपस्थित



पंचायत समिती सदस्य गजानन होनराव यांची चाकूर पंचायत समितीच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या गटनेती पदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून सदरील निवडीचे पत्र आज जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते तथा पंचायत समिती सदस्य सूरज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशचे शिवानंद हेंगणे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, शिवाजीराव देशमुख, अनिलराव वाडकर, व्यंकट वंगे, सादिक शेख, संदीप शेटे, सचिन होते.

माझ्यासारख्या पहिल्यांदा निवडून आलेल्या तरुण कार्यकर्त्यावर सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी गटनेते पदाची जबाबदारी दिली त्यांचा हा विश्वास सार्थ ठरवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील साहेब व सर्व पंचायत समिती सदस्य ,सदस्या व पक्ष श्रेष्ठींची या नवीन जबाबदारी बद्दल मनापासून आभार व धन्यवाद

गजानन होनराव-नवनिर्वाचित गटनेते पंचायत समिती चाकूर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष

# डी. बी. इन्स्टिट्यूट मध्ये उत्सव २०१६ उत्साहात संपन्न.

चाकूर / मुक्त पत्रकार सुशील वाघमारे :- सर्वश्रेष्ठ दान म्हणून ज्ञानदानाचाच विचार करावा लागेल कारण ज्ञानदानाने एकाच पिढीचा उद्धार न होता अनेक पिढींचा उद्धार होतो. त्यामुळे ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. या दानाने होणारी तृप्ती ही जन्मभराची असते म्हणून ज्ञानदान करणे हे श्रेष्ठ कर्तव्य आहे,असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेबजी पाटील साहेब यांनी केले आहे.



महाळंग्रा येथील डी.बी. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या,उत्सव-२०२६ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटक म्हणून ना. बाबासाहेबजी पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बालाजी वाकुरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातूर येथील प्रसिद्ध उद्योजक प्रवीणजी ब्रिजवासी, चाकूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे तसेच राधेय चारिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष दिनेश बेंबडे, संस्थेच्या सचिव प्रणिताताई बेंबडे, कार्याध्यक्ष विवेक बेंबडे विश्वस्त स्नेहाताई बेंबडे संचालक प्राचार्य डॉ. श्रीकांत ढगे उपस्थित होते.

ना. बाबासाहेब पाटील बोलताना पुढे म्हणाले की आजच्या समाजात संस्कार आणि ज्ञान यांची सांगड घालणे गरजेचे आहे.आज ज्ञान देण्याबरोबरच संस्कार रुजवण्याची नितांत आवश्यकता आहे. आज पालक आणि पालकत्व यांचा अर्थ समजावून सांगण्याची वेळ आली आहे.याचा अर्थ उमगला तरच त्या कुटुंबाची प्रगती होते. आज विज्ञानाने प्रगती केली आहे पण त्याबरोबरच समाजाला योग्य दिशा देण्यासाठी शिक्षण संस्थांनी समाजात पूरक व पोषक असणारे विचार पेरण्याची आणि चांगला समाज घडवण्याची आज गरज आहे. आपल्याला नोकरी हवी आहे,रोजगार हवा आहे पण घरापासून दूर राहून काम करण्याची तयारी दिसत नाही. त्यासाठी पडेल ते काम करण्याची व कामावरील निष्ठा वाढवण्याची गरज आहे. नोकरी आणि उद्योग यापैकी आपण काय स्विकारायचे आणि काय नाकारायचे याचा निर्णय योग्य वेळी घेता आला तर तो या जगामध्ये सर्वोच्च स्थानावर जाऊ शकतो. त्यासाठी पडेल ते कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी व युवकांनी ठेवली पाहिजे, तरच आपल्याला या जगाच्या व्यवहारांमध्ये टिकून राहता येईल. महाळंग्रासारख्या ग्रामीण भागात एमबीए, बी. फार्मसी, डी. फार्मसी आणि पहिली ते दहावी पब्लिक स्कूल सुरु करून एक चांगला उपक्रम राबवला जात आहे याचा मला आनंद आहे. आज शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे आणि त्यासाठी डी.बी. ग्रुप अग्रेसर आहे, याचा मला विशेष आनंद आहे.

उत्सव-२०२६ या कार्यक्रमात विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र,ट्रॉफी,पदक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमबीए कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीकांत ढगे फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जयदीप यादव डी.बी. पब्लिक स्कूलचे प्राचार्य शशिकांत चिल्हरगे तसेच संस्थेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डी.बी. ग्रुपचे प्रशासकीय अधिकारी श्रीहरी वेदपाठक यांनी मानले.

# शेतकऱ्याच्या हिताबरोबरच ग्रामीण विकासाला प्राधान्य;विकसित संपूर्ण महाराष्ट्राचे अर्थसंकल्पात प्रतिबिंब-आ. रमेशआप्पा कराड

लातूर- ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्जाच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करत दोन लाखापर्यंत कर्जमाफी आणि नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केली असून त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांच्या हितासह ग्रामीण विकासाला गती देणारा आहे. हा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब असल्याची प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.



महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला. अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्राच्या विधिमंडळात अधिवेशनात आज शुक्रवारी दुपारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. अजित पवार आज आपल्यात नाहीत त्याच्या जाण्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून निघू शकत नाही अजितदादा यांना श्रद्धांजली म्हणून त्यांच भव्य स्मारक उभारलं जाईल. त्यांच्या नावाने नागरी पुरस्कार सुरु केला जाईल असे देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखवले.

सभागृहात अर्थसंकल्प सादर करताना देवेंद्रजी फडणवीस यांनी चार वर्षात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. एक हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना कॉंक्रिट रस्त्याने जोडण्यात येईल, आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात, पाणंद रस्त्यांना मान्यता, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजनेतून महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल. ३२ हजार ७५६ कोटी मुख्यमंत्री सौर उर्जेसाठी खर्च करण्यात आले असून यावर्षी २० हजार कोटींची तरतूद केली आहे .मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत गिनीज बुकमध्ये महाराष्ट्राची नोंद झाली अशी माहिती दिली.

# नवी दिल्लीत 'महाराष्ट्र साडी महोत्सवा' चे भव्य आयोजन राज्याचा विणकाम वारसा आता देशाच्या राजधानीत

नवी दिल्ली: भारतीय संस्कृती आणि वस्त्रांचा अनमोल वारसा जपणाऱ्या महाराष्ट्रातील विणकरांच्या कलेला दाद देण्यासाठी आणि राज्याचा गौरवशाली हातमाग वारसा साजरा करण्यासाठी, नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे भव्य महाराष्ट्र साडी महोत्सवा चे आयोजन करण्यात आले आहे. १९ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत कस्तुरबा गांधी मार्ग येथील महाराष्ट्र सदन येथे हा सोहळा रंगणार असून, यामध्ये महाराष्ट्राची शान असलेली पैठणी, औरंगाबादचे प्रसिद्ध हिमरू, खण, नारायणपेठी, हॅन्ड पेंटेड साडी यांसह इतर अस्सल हस्तकला कापडांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

या महोत्सवाचा मुख्य उद्देश राज्यातील विणकर आणि कारागीर समुदायासाठी व्यापक प्रसिद्धी आणि बाजारपेठेतील नवीन संधी निर्माण करणे हा आहे. या महोत्सवांतर्गत २१ मार्च २०२६ रोजी एका विशेष फॅशन शोचे देखील आयोजन




करण्यात आले असून, या कार्यक्रमामुळे महाराष्ट्राच्या पारंपरिक वस्त्रकलेला आधुनिक व्यासपीठ मिळणार आहे. या फॅशन शोच्या माध्यमातून राज्याच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवले जाणार असून, यामुळे उपस्थित विणकर आणि सहभागी कारागिरांना मोठी प्रेरणा मिळणार आहे.

सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी खुले असणाऱ्या या प्रदर्शनात ग्राहकांना थेट विणकरांकडून खरेदी करण्याची संधी मिळणार आहे, ज्यामुळे साड्यांच्या शुद्धतेची खात्री आणि रास्त दर मिळण्यास मदत होईल. आधुनिक काळातील महिलांच्या आवडीनुसार पारंपरिक विणकामाला नव्या डिझाईन्सची जोड देऊन येथे विविध साड्यांचे प्रकार मांडले जाणार आहेत. दिल्लीतील साडी प्रेमींनी आणि नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन महाराष्ट्राच्या या समृद्ध वारशाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी केले आहे.

# जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची वार्षिक सभासद नोंदणी अभियान सुरु

लातूर,: लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची सन २०२६ या वर्षासाठीची सभासद नोंदणी शनिवार,दि.७ मार्च २०२६ रोजी पासून सुरु झाली आहे.

लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक शासनमान्य ग्रंथलयांनी आपापल्या तालुक्यातील तालुका प्रतिनिधीकडे दि.२५ मार्च २०२६ रोजी पर्यंत संस्था व व्यक्ती सभासद नोंदणी उदगीरा-सुर्यकांत शिरसे,राम मोतीपवळे,जळकोट-यशवंत कुलकर्णी, अशोक कारभारी,शिरुर अनंतपाळ-काशिनाथ बोडके,देवणी- अनिल पाटील,निलंगा-गुरुलिंग स्वामी, औसा- प्रभाकर कापसे,लातूर- राम मेकले, हुतात्मा स्मारक,लातूर, चाकूर-हावगीराव बेरकीळे,तुकाराम सुगावकर, अहमदपूर-अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, रेणापूर- सिध्देश्वर उकिरडे, या तालुकाप्रतिनिधींकडे आपली वार्षिक ग्रंथालय सभासद नोंदणी वरील प्रमाणे करावी,असे आवाहन जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# सिंधुदुर्गच्या विकासासाठी पर्यावरण समतोल आणि जनहिताला प्राधान्य-मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई, : सिंधुदुर्गच्या विकासासाठी पर्यावरण समतोल राखत स्थानिक जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे,' असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.केंद्र शासनाच्या २४ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने सिंधुदुर्गच्या विविध पर्यावरणविषयक विविध मुद्द्यांवर मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस माजी मंत्री व आमदार दीपक केसरकर, आमदार निलेश राणे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, उपवन संरक्षक मिलनकुमार शर्मा, महाराष्ट्र जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव भारत सिंग, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.विकासकामे करताना



पर्यावरणाची हानी होणार नाही आणि स्थानिक नागरिकांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांवर होणारे परिणाम यावर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यात आली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी- दोडा मार्गाचा विकास आणि पर्यावरण संवर्धन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच सिंधुदुर्ग च्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल विभागाशी संबंधित विविध तांत्रिक मुद्यांसंदर्भात आढावा घेण्यात आला.

केंद्र सरकारच्या नव्या अधिसूचनेमुळे स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांवर आणि रोजगारावर काय परिणाम होऊ शकतो, यावर चर्चा करण्यात आली. सिंधुदुर्गच्या जैवविविधतेचे संवर्धन आणि विकासप्रकल्पांची अंमलबजावणी करताना स्थानिक नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन पावले उचलेली जातील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडुरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.